<u>प्रारुप मसुदा</u>

## अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर

### करारबध्द पध्दतीने मासिक वेतनावर थेट मुलाखतीद्वारे नेमणुकी बाबत
### (Walk In Interview)

मा. प्रधान मंत्री आवास योजने अंतर्गत शहरस्तरीय तांत्रिक कक्ष स्थापने करीता अहमदनगर महानगरपालिकेच्या प्रकल्प विभागासाठी करारबध्द पध्दतीने १२ महिन्याच्या कालावधीमध्ये मासिक वेतनावर अटी व शर्ती प्रमाणे तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करीता खालील दर्शविलेल्या पदांवर पात्र अर्जदारांच्या थेट पध्दतीने मुलाखती आयोजित करण्यांत येत आहेत.

तरी संबधित पात्र धारकांनी शैक्षणिक पात्रता, अनुभव दाखला व तद्नुषंगिक प्रमाणपत्राच्या सर्व सांक्षाकित प्रती जोडलेला अर्ज मा.आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर यांचे नावे करुन अर्जासह दि. १२/ ०९/ २०१७ रोजी सकाळी १०:०० वाजता समक्ष आवश्यक त्या सर्व मुळ कागदपत्रासह मा.आयुक्त कार्यालय, अहमदनगर महानगरपालिका, औरंगाबाद रोड येथे थेट पध्दतीने मुलाखतीसाठी उपस्थित रहावे उशिरा आलेल्या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही. **सदर करारबध्द पध्दतीने मासिक वेतनावर नियुक्ती बाबतच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे राहतील.**

| अं. क्र. | तात्पुरत्या स्वरुपात पदांचे नांव | पद संख्या | आवश्यक शैक्षणिक पात्रता | मासिक वेतन |
|---|---|---|---|---|
| १ | प्रोजेक्ट इंजिनियर | १ | स्थापत्य अभियांत्रिकीमध्ये पोस्ट ग्रॅज्युएट अथवा स्थापत्य अभियांत्रीकी मधील पदवी व पब्लिक हेल्थ इंजिनिरींग डिप्लोमा किमान ३ वर्षाचा डिझाईन व इन्फ्रास्ट्रचर कामाचा अनुभव. | ४५,०००/- |
| २ | टाऊन प्लॅनिंग स्पेशालीस्ट | १ | पोस्ट ग्रॅज्युएट इन अर्बन प्लॅनिंग अथवा अर्बन प्लॅनिंग किंवा रिझनल प्लॅनिंग मध्ये पदवी व ३ ते ५ वर्षाचा अर्बन प्लॅनिंग मधील परवडणारी घरे / झोपडपट्टी पुनवर्सन मध्ये कामाचा अनुभव | ४५,०००/- |
| ३ | जी.आय.एस. स्पेशालीस्ट / एम.आय.एस. स्पेशालीस्ट | १ | एम.आय.एस. स्पेशालीस्ट पोस्ट ग्रॅज्युएट / ग्रॅन्युएट / डिप्लोमा इन कॉम्प्युटर सायन्स / इलेक्ट्रानिक्स किंवा एम.सी.ए./पी. जी. डी. सी.ए.व ३ ते ५ वर्षाचा शासकीय, निमशासकीय , स्थानिक स्वराज्य संस्था किंवा नामांकीत कंपनी मध्ये व साफ्टवेअर डेव्हलपमेंट व डाटा बेस मॅनेजमेंट बाबत अनुभव आवश्यक. | ४५,०००/- |

### <u>मासिक वेतनावर नियुक्तीसाठी अटी व शर्ती</u>

१. संबधितांची सदरची नियुक्ती मासिक वेतन तत्वाः प्रमाणे करारबध्द पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपातील कालावधी करीता असल्याने मा.प्रधानमंत्री आवास योजने अंर्तगत शहरस्तरीय तांत्रिक कक्षास प्राप्त होणा-या अनुदानातुनच सदरचे मासिक वेतन अदा करण्यात येईल.

२. सदर मासिक वेतना व्यतिरिक्त शासन सेवा व शर्ती अंतर्गत महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती व अटी) नियम १९८१ नुसार सदरची नियुक्ती नसल्याने त्यानुषंगाने मिळणारे निवृत्ती वेतन , विमा योजना, भविष्य निर्वाह निधी, तसेच कायम सेवेच्या कोणत्याही प्रकारचे लाभ अनुज्ञेय राहणार नाहीत.

३. निवड झाल्यानंतर नियुक्त धारकांनी मासिक वेतनावर करारबध्द पध्दतीने रुजु होणे पुर्वी पोलीस प्राधिका-या कडील चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र व मा.जिल्हा शल्य चिकित्सक ,अहमदनगर यांचे कडील सक्षम असले

F:\aadi\kk2.doc

बाबतचे प्रमाणपत्र देणे आवश्यक राहील.

४. नियुक्तीधारकांचे सदर करारबध्द नियुक्ती कालावधीतील काम समाधानकारक न आढळल्यास व त्यांचे सेवा विषयक काही तक्रारी उद्‌भवल्यास पुर्वसूचना न देता दिलेली मासिक वेतनावरील करारबध्द पध्दतीने नियुक्ती तात्काळ संपुष्टात येईल व त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबधित नियुक्ती धारकावर राहील.

५. सदर निवड झालेल्या संबधितांची मासिक वेतनावरील करारबध्द नियुक्तीचा कालावधी समाप्तीनंतर त्यांना कोणतेही अधिकार राहणार नाहीत.

६. सदर नियुक्ती पुर्णतः मासिक वेतन तत्वानुसार करारा प्रमाणे अटी व शर्ती नुसार तात्पुरत्या स्वरुपात असल्याने सदर नियुक्तीचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर सेवेत कायम नियुक्ती होणे बाबत व कायम सेवेचे कुठल्याही प्रकारचे फायदे मिळणे करीता नियुक्ती धारकास मा. न्यायालयात अथवा उच्च न्यायालयात याबाबत दाद मागता येणार नाही. सदरची मुदत संपल्यानंतर सदरचा करारबध्द नियुक्ती आदेश हा अपोआप व्यपगत होईल.

७. नियुक्त झालेल्या संबधितांना नियुक्ती वेतनावरील कालावधीमध्ये कार्यालयीन परवानगी शिवाय त्यांना कार्यक्षेत्र सोडता येणार नाही.

८. निवड झालेल्या संबधितांना सदर नियुक्ती कालावधीतील वेतनावरील सेवेचा राजीनामा दयावयाचा असेल तेव्हा मा.आयुक्त,अहमदनगर महानगरपालिका यांचे कडे १५ दिंवसाच्या आतं त्यांना याबाबत पुर्व सुचना म्हणुन नोटीस दयावी लागेल.

९. सदर मासिक वेतन कालावधीतील नियुक्ती करीता दिलेली माहिती खोटी असल्याचे निष्पन्न झाल्यास उपरोक्त करारबध्द नियुक्ती तात्काळ रद्द करण्यांत येवून सेवा समाप्त करण्यांत येईल.

१०. विवाहीत असल्यास एक पती किंवा एक पत्नी असावे.

११. महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम ०५मधील प्रतिज्ञा पत्राचा नमुना अ (नियम ४)अपत्या बाबतचे प्रतिज्ञापत्र करुन दयावे लागेल.

१२. तात्पुरत्या स्वरुपात सदर करारबध्द नियुक्ती कालावधीमध्ये सेवेत हलगर्जीपणा, निष्काळजीपणा व इतर काही त्रुटी उद्‌भवल्यास त्या बाबतची सर्वस्वी जबाबदारी ही नियुक्त झालेल्या संबधितांवर राहील व त्यांचेवर नियमानुसार कारवाई करण्यांत येईल.

१३.मुलाखती बाबतचे सर्व अधिकार व हक्क,पदांच्या फेरबदल व अटी व शर्ती बाबतचा अधिकार आणि सदर जाहिराती मधील पदे भरणे बाबत कोणताही अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार मा.आयुक्त,अहमदनगर महानगरपालिका यांना राहील. कोणताही किंवा सर्व अर्ज काही कारण न दर्शविता नाकारण्याचा अधिकार राखून ठेवीत आहेत. व याब्राबत कोणत्याही अर्जदारास त्या बाबत लेखी कळविण्यात येणार नाही.

१४. मासिक वेतना वरील करारबध्द नियुक्ती झालेल्या संबधितांनी सदरचा नियुक्ती आदेश मिळताच ७ दिवसाचे आत प्रकल्प विभागात हजर व्हावे लागेल अन्यथा सदर दिलेला नियुक्ती आदेश तात्काळ संपुष्टात आले बाबत समजण्यात येईल.

१५. सदर करारबध्द नियुक्त झालेल्या संबधितांनी वरील सर्व अटी व शर्ती मान्य असले बाबतचे तसे लेखी करारपत्र रु.१००/- च्या मुद्रांकावर मा. जिल्हा दंडाधिकारी , अहमदनगर अथवा त्यांनी अधिकार प्रदान केलेले अधिकारी यांचे समोर साक्षांकीत करुन देणे बंधनकारक आहे.

**मा.आयुक्त यांचे मान्यतेने.**

उप-आयुक्त
तथा सदस्य सचिव निवड समिती
अहमदनगर महानगरपालिका

F:\aadi\kk2.doc